# महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.

## परिपत्रक

**विषय : महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा राजपत्रित संवर्गातील अधिका-यांची व्यावसायिक परीक्षा.**
**सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व सहाय्यक अभियंता (श्रेणी १)/**
**उपविभागीय अभियंता/उपविभागीय अधिकारी / उप अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत)**
**यांची माहे फेब्रुवारी २०१२ मध्ये घेण्यांत येणारी व्यावसायिक परीक्षा...............**

**संदर्भ:** महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ठ एक (परिच्छेद ५४).

महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग क्रमांक इओक्सएम/१०१२ (४४५) दिनांक ६/९/८२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार जलसंपदा विभाग (पाटबंधारे विभाग) व सार्वजनीक बांधकाम विभागातील अधिका-यांच्या विषयांकित व्यावसायिक परीक्षा दिनांक **१४/२/२०१२ ते १७/२/२०१२** या कालावधीत महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक या कार्यालयामार्फत घेण्याचे नियोजीत केले आहे. सदर परीक्षा महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली व वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार घेण्यात येतील.

**सदरचे परिपत्रक, प्रवेश अर्जासंबंधीच्या सूचना व प्रवेश अर्ज नमुना इ.माहीती प्रबोधिनीच्या संकेतस्थळावर (www.metanasik या website वर) उपलब्ध आहे. मागील वर्षाचा प्रवेश अर्जाचा नमुना ग्राहय धरला जाणार नाही. प्रबोधिनीतर्फे कोरे अर्ज पुरविण्यांत येणार नाहीत याची नोद घेण्यात यावी.**

२/- स्थापत्य संवर्गातील फक्त सहाय्यक कार्यकारी अभियंता आणि विद्युत / यांत्रिकी संवर्गातील सहाय्यक अभियंता श्रेणी-१/उप अभियंता यांची व्यावसायिक परीक्षा फक्त नाशिक या केंद्रावरच घेण्यात येईल.

३/- स्थापत्य संवर्गातील सहाय्यक अभियंता श्रेणी-१ /उपविभागीय अभियंता /उपविभागीय अधिकारी /उपअभियंता यांची व्यावसायिक परीक्षा १) नाशिक, २) पुणे, ३) औरंगाबाद ४) नागपूर या केंद्रांवर घेण्याचे नियोजित आहे. जर परीक्षार्थींची संख्या कमी असेल तर परीक्षा केंद्रांमध्ये बदल करण्यात येईल. आयोजित परीक्षा केंद्रांची ठिकाणे परीक्षार्थीस परीक्षेच्या प्रवेश पत्रान्वये (Hall ticket) कळविण्यात येतील.

४/- इच्छुक परीक्षार्थींनी प्रवेशासाठी अर्जाचा नमुना परस्पर नियंत्रक अधिका-यांकडून मागवून घ्यावा किंवा प्रबोधिनीच्या संकेत स्थळावरुन प्राप्त करुन घ्यावा.

५/- सन २०१२ च्या परीक्षेसाठी प्रवेशअर्ज पूर्णपणे भरुन नियंत्रक अधिका-यांमार्फत आवश्यक शिफारसीसह दिनांक **१६/१/२०१२** पूर्वी कार्यालयांत पोहोंचेल अशारितीने पाठवावा. दि. **१६/१/२०१२** नंतर आलेल्या, तसेंच अपुरी माहिती / अपुरी प्रमाणपत्रे असलेल्या व संबंधित नियंत्रक अधिकारी यांचेमार्फत न आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहारही केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

६/- **सार्वजनीक बांधकाम पुस्तिकेमधील परीक्षा नियमावलीनुसार व वेळोवेळी शासनाकडून निर्गमित झालेल्या मार्गदर्शक सुचनानुसार व्यावसायिक परीक्षेस बसण्यास अर्जदार पात्र असल्याबद्दलची नियंत्रक अधिकारी यांनी स्वत: खात्री करावयाची असून त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी नियंत्रक अधिकारी यांची राहील.**

७/- नियंत्रक अधिका-यांकडून अर्ज पाठविण्यांस उशिर झाला व परीक्षार्थीस प्रवेश नाकारण्यांत आला तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिका-यांची राहील.

८/- सर्व नियंत्रक अधिका-यांना विनंती करण्यांत येते की, या परीपत्रकाचा मजकूर मिळाल्यापासून २ (दोन) आठवडयाच्या आत इच्छुक परीक्षार्थींच्या निदर्शनास आणावा. विहित नमुना अर्ज व सुचनापत्र यांच्या झेरॉक्स प्रती काढून त्या इच्छुक परीक्षार्थींना उपलब्ध करुन द्याव्यात. परीक्षार्थीने सादर केलेले अर्ज सर्व त-हेने पूर्ण भरुन, सर्व बाबींची सत्यता पडताळणी व विशेष करुन सूचना पत्रकातील सूचना क्र. (१२) पत्र क्र. (१३) च्या अनुषंगाने तपासणी करुन, आवश्यक तेथे प्रमाणपत्र देऊन सदर अर्ज प्रबोधिनीकडे दिनांक **१६/१/२०१२** पर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचेल अशा पध्दतीने पाठवावेत अथवा खास दूतामार्फत सादर करावेत.

सहपत्र : १) प्रवेश अर्जाचा नमुना
२) प्रवेश पत्राचा नमुना
३) प्रवेश अर्ज भरण्याबाबत सुचना

मुख्य अभियंता
संकल्पन,प्रशिक्षण,संशोधन व सुरक्षितता
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

जा.क्र.मअप्रप्र/व्याप/रापअ/परीक्षा/ ६७ /२०११
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४.
दिनांक: २५ / ११ /२०११

**कृपया मागे पहावे ..**

**मागील पानावरुन ..**

परि. २/२

अ) प्रतिलिपी -

१. मा. सचिव, (जलसंपदा) / (लाक्षेवि ) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी सादर.

२. मा.सचिव, (सां.बा.)/(रस्ते) सार्वजनीक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना महितीसाठी सादर.

३. मा. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,नाशिक यांना सादर.

४. मा. कार्यकारी संचालक, ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------- यांना माहितीसाठी सादर.

ब) प्रतिलिपी - माहितीसाठी व योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग / सा.बां.विभाग, -----------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

२. आयुक्त (महसूल विभाग / महानगरपालीका) -------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

३. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग / सा.बां.विभाग, -------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

४. जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी / संचालक ---------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**प्र.अर्ज १/३**

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.
## महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा मधील राजपत्रित संवर्गासाठी व्यावसायिक परीक्षा सन २०१२
## प्रवेश अर्ज

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक
**कार्यालयाच्या उपयोगासाठी.**

**म.अ.प्र.प्र.नोंदणी क्रमांक व दिनांक:**

**आसन क्रमांक**

**परीक्षार्थीने भरावयाची माहिती -**

**अभियांत्रिकी कक्षाचे नांव :-** स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत/

**व्यावसायिक परीक्षेचा प्रवर्ग :-** सहाय्यक कार्यकारी अभियंता/ स.अ.श्रेणी-१/ उ.वि.अभियंता उ.वि.अधिकारी / उपअभियंता

**परीक्षा केंद्र :** नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर

**परीक्षा शुल्क देय आहे काय?:-** आहे/नाही
**धनाकर्षाचा तपशील:-**
(बँकेचे नाव व शाखा)
**धनाकर्ष क्रमांक व दिनांक:**
(अर्जासोबत धनाकर्ष अनिवार्य)

**(टिप:** परीक्षार्थीने भरावयाच्या माहीतीमधील अनावश्यक पर्याय खोडावेत.**)**

================================================================

## परीक्षार्थींचे विनंतीपत्र

प्रति,
मा. मुख्य अभियंता
संकल्पन,प्रशिक्षण,संशोधन व सुरक्षितता,
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी रोड, नाशिक.

पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व संबंधीत का.अ./अ.अ. यांनी प्रमाणित करावा.

(नियंत्रक अधिकारी यांचे मार्फत सविनय सादर)

**विषय:- सन २०१२ मध्ये घेतली जाणारी सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व सहाय्यक अभियंता (श्रेणी १) / उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी / उप अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) यांची व्यावसायिक परीक्षा...**

मा.महोदय,

मी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------

विषयांकित संवर्गातील ------------------------------------------------------------------ या प्रवर्गाच्या व्यावसायिक परीक्षेस प्रवेश मिळणेसाठी विहित नमुन्यातील अर्ज माझे नियंत्रक अधिकारी, अधीक्षक अभियंता / मुख्य कार्यकारी अधिकारी ------------------------------------------------------------------ मार्फत सविनय सादर करीत आहे.

मी व्यावसायिक परीक्षेच्या अभ्यासक्रमाची आणि परीक्षा नियमावलींची माहिती करुन घेतली आहे.

प्रवेश अर्जामधील माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे आढळून आल्यास मी परीक्षार्थी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------ शिस्तभंगाच्या कारवाईस / विभागीय चौकशीस आणि उत्तीर्ण झाल्यामुळे घेतलेले सेवालाभ गमविणे या दोन्ही बाबीस पात्र ठरेन याची मला पूर्ण जाणीव आहे याचीही मी नोंद घेतली आहे.

माझा वैयक्तिक तपशील पुढीलप्रमाणे -

प्र.अर्ज २/३

## परीक्षार्थीची वैयक्तिक माहिती

१. **परीक्षार्थीचे नांवः-** **आडनांव** **पहिले नांव** **मधले नांव**

**मराठी**

**इंग्रजी**

२. **जन्मदिनांकः-**

३. **शैक्षणिक पात्रताः-**

४. **पदनामः-**

**५. पदावर रुजू झाल्याचा दिनांकः-**

६. **नेमणूकीचा / पदोन्नतीचा आदेश क्रमांक व दिनांकः-**

७. **कार्यरत कार्यालयाचा तपशिल (दूरध्वनी क्रमांकासह):-**
**अ) उपविभागः**

**ब) विभागः**

**क) मंडळः**

८. **परीक्षार्थीस ज्या विषयांच्या परीक्षेस बसावयाचे आहे त्या विषयांची नांवे:**

| अ.क्र. | परीक्षांचे विषय | परीक्षार्थीने निवडलेले विषय |
|---|---|---|
| १ | अनिवार्य विषयः सामान्य अभियांत्रिकी (स्था./यां./वि.)<br>(प्रश्नपत्रिका - १) | |
| २ | ऐच्छिक विषयः<br>(प्रश्नपत्रिका - २) | |
| ३ | अनिवार्य विषयः लेखानियम<br>(प्रश्नपत्रिका - ३) | |
| ४ | अनिवार्य विषयः प्रात्यक्षिकः स्थापत्य (सर्वेक्षण)/यांत्रिकी /विद्युत)<br>(प्रश्नपत्रिका - ४) | |
| **टिपः- सहाय्यक कार्यकारी अभियंता प्रवर्गासाठी प्रात्यक्षिक परीक्षा नाही.** | | |

९. **परीक्षेसाठी निवडलेले केंद्रः-** ----------------------------------------------
(नाशिक/ पुणे / औरंगाबाद / नागपूर यापैकी एक)

**१०. यापुर्वीच्या व्यावसायिक परीक्षेमध्ये महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियम परीशिष्ट १ ब पोटनियम १२ नुसार सुट मिळालेल्या विषयाचा तपशील:**

| अ.क्र. | विषय | प्राप्त गुण/ एकूण गुण | परीक्षेचे वर्ष / आसन क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**(टिपः- वर नमूद केलेल्या सूट प्राप्त विषयांची नियंत्रक अधिका-याने मुळ निकालपत्रावरुन खात्री करावी.)**

सहपत्र: १) स्वत:चे संपूर्ण नाव,पत्ता लिहीलेले
आणि पोष्टाचे रु.१०/- चे तिकीट
लावलेला लिफाफा (२२.५ X १० से.मी.)

आपला / आपली विश्वासू,

(उमेदवाराची सही)

दिनांक: ठिकाण:

## नियंत्रक अधिका-यांचे प्रमाणपत्र

**प्रमाणित करण्यांत येते की -**

१/- परीक्षार्थी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------------------

यांची प्रथम नेमणूक --------------------------------------------------------- या पदावर झाली असून त्यांचे सध्याचे पद

------------------------------------------------------------------------ आहे व ते या पदावर दिनांक -------------

पासून कार्यरत आहेत. **त्यांची पदोन्नती अभावित / तात्पुरती नसल्याने ते परीक्षेस बसण्यास पात्र आहेत.**

२/-परीक्षार्थीने अर्जात भरलेल्या बाबींची पडताळणी सेवा पुस्तकावरुन / मूळ दप्तरावरुन केली असून ती बरोबर आहे.

३/-सन ------------------ या वर्षाच्या परीक्षेच्या निकालाच्या आधारावर परीक्षार्थीस सूट देय ठरत असलेले विषय मी त्याच्या मुळ निकाल पत्रावरुन तपासले असून ते बरोबर आहेत.

४/- श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------------------------पदनाम ----------------------------- यांचे वय त्यांच्या राजपत्रित संवर्गाचे **पदोन्नतीचे** दिनांकास ४० वर्षे पूर्ण आणि ४५ वर्षापेक्षा कमी असून महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम पुस्तिकेमधील परीक्षा नियमावलीतील [नियम (बी)-२] नुसार त्याची खातरजमा केलेली आहे त्यांना लेखानियम या विषयाखेरीज इतर सर्व विषयांत सूट देय आहे. सदरची सूट त्यांना कार्यालयीन आदेश क्र.------------------------------------------------------------- अन्वये देण्यात आलेली आहे.

५/- महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम पुस्तिकेमधील नियमानुसार श्री. ---------------------------------------------- परीक्षेस बसण्यास पात्र असल्याने त्यांना परीक्षेस प्रवेश देण्यास शिफारस करण्यांत येंत आहे.

**दिनांक:**
**ठिकाण:**
**व शिक्का**

**नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी**

---

## प्रबोधिनीच्या कार्यालयीन उपयोगासाठी

**उपसंचालक (व्या.प.)**

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

**प्रबोधिनीने दिलेला आसन क्रमांक**

## महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक ४२२००४.

विषय : सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता (श्रेणी १)/ उपविभागीय अभियंता/ उपविभागीय अधिकारी, उप अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) यांची सन फेब्रुवारी २०१२ मध्ये घेण्यांत येणारी व्यावसायिक परीक्षा...

## -सूचनापत्रक -

### व्यावसायिक परीक्षेस प्रवेश अर्ज भरण्यासंबंधी सविस्तर सूचना

१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

२) प्रवेश अर्जासाठी विहित नमुन्याची टंकलिखीत अगर छायांकित प्रत वापरावी.

३) प्रवेश अर्जावर आणि परीक्षा प्रवेशपत्रावर परीक्षार्थीने स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो दर्शविलेल्या जागी चौकोनामध्ये चिकटविणे आवश्यक आहे. सदर फोटोवर संबंधीत का.अ./ अ.अ. यांचा साक्षांकनासाठी सही व शिक्का असणे अनिवार्य आहे.

४) परीक्षार्थीने संपूर्ण नांव ठळक अक्षरांत मराठीमध्ये आणि इंग्रजीत (प्रथम लिपीत) लिहावयाचे आहे.

५) परीक्षार्थीने (मूळ सेवापुस्तकातील नोंदीप्रमाणे) त्याची जन्मतारीख लिहावी.

६) परीक्षार्थीने ज्या शासकीय आदेशानुसार पदोन्नती / नियुक्ती देण्यांत आली त्या आदेशाचा दिनांक व क्रमांक नमूद करावयाचा आहे.

७) परीक्षार्थी शासनाच्या जलसंपदा / सार्वजनीक बांधकाम विभागा व्यतिरीक्त इतर अशासकीय / निमशासकीय अथवा महामंडळे (जसे की MIDC,महापालिका ) यांचे अधिकारी असाल, तर तुम्हाला परीक्षा शुल्क रु.५००/- भरावे लागतील. सदरचे परीक्षा शुल्क धनाकर्षाव्दारे (डिमांड ड्राफ्ट ) **Assistant.Director (Adm.) M.E.T.A., Nashik-4** यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडिया,नाशिक यांचे नावे काढून प्रवेश अर्जासमवेत जोडणे आवश्यक आहे.

८) विहित नमुन्यातील मूळ अर्ज व परीक्षा प्रवेश पत्र एकाच प्रतीत पाठवावयाचा असून, त्यासोबत स्वतःचा पूर्ण पत्ता नमूद केलेला
रु.१०/- किंमतीच्या टपाल तिकीटासहित, २२.५ सें.मी. x १० सें.मी. आकाराचा लिफाफा जोडणे अनिवार्य आहे.
(सूचनापत्रक / परिपत्रक अर्जासोबत जोडू नये).

९) विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज संपूर्ण भरुन तो परीक्षार्थीने नियंत्रक अधिका-यांकडे सादर करावा. नियंत्रक अधिका-यांमार्फत न आलेले अर्ज स्विकृत करण्यात येणार नाहीत.

१०) अर्ज स्वीकृतीचा अंतिम दिनांक १६/१/२०१२ असून, नियंत्रक अधिका-याने शिफारस केलेले अर्ज मुदतीपूर्व प्रबोधिनीकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. दि. १६/१/२०१२ नंतर आलेले अर्ज स्विकृत केले जाणार नाहीत व अर्ज उशिरा प्राप्त झाल्यामुळे परीक्षार्थीस परीक्षेस बसण्यास परवानगी न मिळाल्यास प्रबोधिनी जबाबदार रहाणार नाही.

११) परीक्षार्थी ज्या अभियांत्रिकी संवर्ग (सहाय्यक कार्यकारी अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-१/उपविभागीय अभियंता /उपविभागीय अधिकारी/उपअभियंता) आणि कक्ष (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) यांचेशी संलग्न आहे ते स्पष्टपणे नमूद करावे.

१२) परीक्षेस बसण्याकरीता परीक्षार्थीची पात्रता:-
(१) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ (सहाय्यक कार्यकारी अभियंता) मध्ये सरळ सेवेने नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी.
(२) अ) - महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (सहाय्यक अभियंता श्रेणी-१) मध्ये सरळ सेवेने नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी.
ब) - (स्थायी व अस्थायी पर्यवेक्षक व कनिष्ठ अभियंते यांच्या पदावरुन) स्थायी, अस्थायी किंवा स्थानापन्न नात्याने बढती देण्यात आलेले उपअभियंता / उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी.

टिप:- अभावित (Fortutions) / तात्पुरती बढती देण्यात आलेल्या उपअभियंता / उपविभागीय अभियता / उपविभागीय अधिकारी यांनी सदर परीक्षेस अर्ज करुन नयेत. (संदर्भः पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र. परीक्षा १००२/७२९४/(१७३/२००१) आ प्रशिक्षण दि. २५/७/२००३).

१३) (अ )परीक्षार्थी / उमेदवाराचे वय त्याचे पदोन्नतीचे दिनांकास ४० वर्षे पूर्ण किंवा ४५ वर्षापेक्षा कमी असल्यासच, त्या आधारावर सूट देय राहील. अशा बाबतीत परीक्षार्थीस इतर विषय वगळून फक्त लेखा नियम या विषयाकरीता परीक्षेस बसावे लागेल. व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट मिळण्याच्या प्रयोजनासाठी असलेले ४० ते ४५ पर्यंतचे वय, पदोन्नतीच्या प्रथम नियुक्ती करण्यांत आल्याच्या तारखेच्या संदर्भात हिशेबाबत घेण्यांत यावे आणि जोपर्यंत परीक्षा प्रथम नियुक्तीच्या तारखेच्या संदर्भात घेण्यांत येते तोपर्यंत उमेदवाराचे वय नंतर ४० किंवा ४५ वर्षे झाल्यामुळे ती उत्तीर्ण होण्याचे त्याचे दायित्व समाप्त होणार नाही.( महा.सार्व.बांधकाम नियमावली परिशिष्ट-१, बी-२ ).

(ब) परीक्षार्थी वयोमानानुसार सूटपात्र ठरत असल्यास, त्याचे नियंत्रक अधिका-याने प्रवेशअर्जातील प्रमाणपत्रांत शिफारस करणे अनिवार्य आहे. त्याखेरीज अशा प्रकारची सूट देय ठरणार नाही.याबाबत महाराष्ट्र सार्व.बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट १, भाग-२ मधील नियम (बी)-२ चे काटेकोरपणे पालन करावे.

१४) मागील व्यावसायिक परीक्षेच्या गुणपत्रकाच्या आधारे सूट प्राप्त असेल तर सूट नमुद करावयाची असते. परीक्षार्थीची उत्तीर्ण विषयांतील गुणांची टक्केवारी ७० पेक्षा अधिक असेल तर एका अनुत्तीर्ण विषयाकरीतांच सदरची सुट देय ठरते. परीक्षार्थी अशा प्रकारे सुटपात्र ठरत असल्यास, गुणतक्ता नियंत्रक अधिका-यांकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे.
(महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका-परिशिष्ट १ ब - नियम १२ पहावे).

१५) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिका १ चा अनिवार्य विषय तो ज्या विभागांत काम करीत असेल त्या विभागातील कक्षाशी संबंधीत असा निवडणे आवश्यक आहे.

१६) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिका क्र. २ चा ऐच्छिक विषय म्हणून खाली दिलेल्या विषयांपैकी एक विषय निवडावा. सदर विषय तुमच्या कार्यालयीनकामाशी प्रत्यक्ष संबंधित असलेला एक विषय असावा. एकदां एक विषय निवडल्यानंतर तो बदलण्याची कोणत्याही परिस्थितीत अनुमती दिली जाणार नाही.

| विभाग | ऐच्छिक विषय |
|---|---|
| अ) जलसंपदा | १) सिंचन व सिंचन विषयक कायदे |
| | २) भूजलनिःस्सारण |
| | ३) मातीच्या धरणाची संकल्पचित्रे व बांधकाम |
| | ४) दगडी व काँक्रीटच्या धरणांचे बांधकाम |
| | ५) उपसा सिंचन योजनांचे बांधकाम व परिरक्षण |
| ब ) सार्वजनीक बांधकाम | १) रस्ते , इमारती , पूल (अधुनिक पध्दतीच्या रस्ते बांधणीच्या खास पध्दतीसह) |
| क) यांत्रिकी | १) विंधन |
| | २) यांत्रिकी अवजारांचा उपयोग |
| ड) विद्युत | १) विजेचे प्रकल्प व प्रकल्पांचे व्यवस्थापन संबंधीचे वैधानिक कायदे |
| | २) जलविद्युत निर्मिती |
| | ३) उपकेंद्र आणि शक्ती केंद्राची आंतरिक जोडणी |
| | ४) औष्णिक विद्युत निर्मिती |
| | ५) विजेचे प्रक्षेपण व वितरण |

१७) परीक्षा प्रवेश अर्जासोबत परीक्षा प्रवेश पत्र जोडलेले असून त्यावर परीक्षार्थीने स्वतःचे नाव, पूर्ण पत्ता, ऐच्छिक विषय व फोटो लावून तो आपले नियंत्रक अधिकारी यांचेकडून साक्षांकित करुन घेणे अनिवार्य आहे.

१८) परीक्षा प्रवेश अर्जासोबत १०/- रुपये किंमतीच्या टपाल तिकीटासह स्वतःचा पत्ता लिहीलेला २२.५ x १० सें.मी. लिफाफा प्रवेश पत्र पाठविण्यासाठी जोडणे आवश्यक आहे.

१९) परीक्षार्थीने दिलेली माहिती दिशाभूल करणारी अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास परीक्षार्थी शिस्तभंगाची कार्यवाही व परीक्षा विषयक फायदे गमावणे या दोन्ही बाबतीत पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

२०) प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल हा अंतिम राहणार आहे. महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम पुस्तिकेतील परीक्षा नियमानुसार निकालाची फेरतपासणी केली जाणार नाही तसेंच उत्तरपत्रिकांचे गुणपडताळणी / पुनर्मूल्यांकन केले जात नाही याची नोंद घ्यावी.

मुख्य अभियंता
संकल्पन,प्रशिक्षण,संशोधन व सुरक्षितता
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

# परीक्षा प्रवेश पत्र

जा.क्र. मअप्रप्र/रापअ/व्याप/प्रवेशपत्र/

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.
दिनांक:

प्रति,

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व संबंधित का.अ./अ.अ. यांनी प्रमाणित करावा.**

(परीक्षार्थीने स्वत:चा संपूर्ण पत्ता पिनकोडसह लिहावा)

**विषय:- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ राजपत्रित संवर्गातील माहे फेब्रुवारी २०१२ मधील व्यावसायिक परीक्षेचे प्रवेश पत्र. सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्था) व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ / उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी / उपअभियंता (स्था/यां/वि) प्रवर्ग.**

**दिनांक १४/२/२०१२ ते १७/२/२०१२** या कालावधीत होणा-या विषयांकित व्यावसायिक परीक्षेला बसण्यासाठी आपणांस परवानगी देण्यात येत आहे.

**परीक्षार्थी आसन क्रमांक** ________ (परीक्षार्थीने उत्तरपत्रिकेवर सदर आसनक्रमांक लिहावयाचा आहे)

**१) परीक्षा केंद्र व ठिकाण:**

**२) समन्वय अधिकारी यांचे नांव व पत्ता:**

**३) परीक्षेचे वेळापत्रक:**

| वार | दिनांक | वेळ (कालावधी) | विषय | शेरा |
|---|---|---|---|---|
| मंगळवार | १४/२/२०१२ | १०.०० ते १३.०० | सामान्य अभियांत्रिकी (स्था./यां./वि.) - **(लेखी)** | परीक्षार्थीने ऐच्छिक विषयाचे नांव लिहावे. **ऐच्छिक विषय** |
| | | १५.०० ते १५.३० | सामान्य अभियांत्रिकी (स्था./यां./वि.) - **(तोंडी)** | |
| बुधवार | १५/२/२०१२ | १०.०० ते १३.०० | ऐच्छिक विषय (स्था./यां./वि.) - **(लेखी)** | |
| | | १५.०० ते १५.३० | ऐच्छिक विषय (स्था./यां./वि.) - **(तोंडी)** | |
| गुरुवार | १६/२/२०१२ | १०.०० ते १३.०० | लेखानियम (स्था./यां./वि.) - **(लेखी)** | |
| | | १५.०० ते १५.३० | लेखानियम (स्था./यां./वि.) - **(तोंडी)** | |
| शुक्रवार | १७/२/२०१२ | समन्वय अधिकारी वेळ जाहिर करतील. | प्रात्यक्षिक परीक्षा (स्था./यां./वि.) | |

टीप:- सहाय्यक कार्यकारी अभियंता पदाकरीता प्रात्यक्षिक परीक्षा नाही

**परीक्षार्थीची स्वाक्षरी** | **कार्यकारी अभियंता यांची सही व शिक्का** | **उपसंचालक म.अ.प्र.प्र.,नाशिक.**

मागील पानावरुन ..

परीक्षार्थीसाठी विशेष सूचना :

१) परीक्षार्थीने परीक्षेच्या वेळेपूर्वी कमीत कमी १० (दहा) मिनिटे अगोदर परीक्षा कक्षांत उपस्थित असणे जरुर आहे. परीक्षा सुरु झाल्यानंतर अर्ध्या तासानंतर येणा-या उमेदवारांस परीक्षेस उपस्थित राहण्यांस परवानगी देण्यांत येणार नाही.

२) परीक्षार्थीने परीक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य उदा. पेन, पेन्सिल, खोडरबर, गणिती उपकरणे, इ. स्वतः आणावयाचे आहे.

३) परीक्षेस येतांना हे प्रवेशपत्र सोबत आणावे व समन्वय अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी ज्या ज्या वेळी मागतील त्या त्या वेळी दाखवावे.

४) परीक्षार्थींनी कुठलाही थेट पत्रव्यवहार महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीशी करु नये. असा पत्रव्यवहार करणा-याची गंभीर दखल घेण्यांत येईल.

५) प्रवेशपत्र परीक्षेचा निकाल लागून त्याची सेवापुस्तकात नोंद होईपर्यंत जपून ठेवावे. याची दुसरी किंवा नक्कल प्रत मिळणार नाही.

परीक्षेच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक आपल्या माहितीकरीता सोबत जोडले आहे. परीक्षेच्या संबंधात आपणास काही अडचण आल्यांस आपले केंद्राचे समन्वय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

(सही/- xxxxxx)
उपसंचालक (व्या.प.)
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

****************************